CR2021060105

राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेतील त्रुटींची पूर्तता करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक क्र. अंनियो-२०२०/प्र.क्र.३७/सेवा-४
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०१ जून, २०२१

वाचा :

१) शासन परिपत्रक क्रमांक: अंनियो-२०२०/प्र.क्र.३७/सेवा ४, दिनांक ०४.१२.२०२०.
२) शासन शुध्दीपत्रक क्रमांक : अंनियो-२०२०/प्र.क्र.३७/सेवा ४, दिनांक २४.२.२०२१.

शासन परिपत्रक-

कोरोना संक्रमणाची साखळी खंडीत करण्याकरिता कोव्हीड १९ सार्वत्रिक साथरोगाच्या व्यवस्थापनाशी संबंधित असलेल्या आकस्मिक सेवांखेरीज, सर्व शासकीय कार्यालये (राज्य, केंद्र, स्थानिक प्राधिकरणाखालील) फक्त १५% उपस्थितीसह चालू आहेत. शासकीय कार्यालयातील मर्यादीत उपस्थितीमुळे संदर्भाधीन क्र.१ व २ अन्वये राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेमधील त्रुटींची पूर्तता आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून होऊ शकली नाही. सबब सदर कामात अडचणी उद्भवत असल्याने प्रमाणपत्र सादर करण्यास खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

संदर्भाधीन क्र.१ येथील परिपत्रकात नमूद प्रमाणपत्र सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी माहे जुलै, २०२१ पासून दरमहाच्या वेतन देयका सोबत देणे आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्र वेतन देयकासोबत सादर न केल्यास माहे जुलै २०२१ (देय ऑगस्ट २०२१) पासुनची वेतन देयके स्विकारण्यात येणार नाहीत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२१०६०११६२७०४९७०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6015944fe7d58a83f4a54c43147b5da1e34861e2984e9f793b66f7249aaa9c1a, pseudonym=CAD826A943AA15444490C64B66C7EE464C4AD05A, serialNumber=D4994742192306FCC1DEA9AADD3810639506519FA652B919767B98B04E905A18, cn=INDRAJEET SAMBHAJI GORE
Date: 2021.06.01 16:33:43 +05'30'

(इंद्रजित सं. गोरे)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य.
३) मा.राज्यपालांचे सचिव.
४) मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव.

५) मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
६) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
७) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
८) मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख.
९) प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
१०) प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
११) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१२) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
१५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१६) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१७) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१८) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.
१९) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
२०) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली.
२१) सर्व विभागीय आयुक्त.
२२) सर्व जिल्हाधिकारी.
२३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२४) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२५) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
२६) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई.
२७) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
२८) सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
२९) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.
३०) सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
३१) वित्त विभागातील सर्व कार्यासने.
३२) निवड नस्ती.